**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर, पशुसंवर्धन आयुक्तालयाशेजारी,
औंध, पुणे-४११००७
दुरध्वनी क्र.०२०-३५०० ०४५०
Email ID-admin@mahaurja.com Website- http://www.mahaurja.com

## जाहिरात

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),औंध, पुणे कार्यालया अंतर्गत शासकीय सेवेतून, सेवानिवृत्त नायब तहसिलदार / मंडल अधिकारी यांस कंत्राटी / सेवा करार पध्दतीने ११ महिन्यासाठी नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता महाऊर्जाच्या https://www.mahaurja.com या वेबसाईटवर जाहिराती सोबत दिलेल्या अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या सेवानिवृत्त नायब तहसिलदार / मंडल अधिकारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/(भाग-१)/१३, दि.०८/०९/२०२३ मधील तरतुदीनुसार देय होणारे मासिक पारिश्रमिक व भत्ते अदा अदा करण्यात येतील.

| अ.क्र. | पदाचे नाव व विवक्षित कामाचे स्वरुप | संख्या | आवश्यक अर्हता | अनुभव | वय | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त नायब तहसिलदार / मंडल अधिकारी | ०१ | शासकीय सेवेतून दि.३०/११/२०२४ रोजी अथवा तत्पुर्वी नायब तहसिलदार / मंडल अधिकारी पदावरुन सेवा निवृत्त झालेले / होणारे अधिकारी | शासकीय सेवेतील नायब तहसिलदार / मंडल अधिकारी पदावर कामकाजाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक | ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे | महाऊर्जा मुख्यालय, पुणे |
| * | पवन व सौर प्रकल्पांची जमीनीची कागदपत्रे याबाबत छाननी तसेच खात्री करणे | | | | | |
| * | महाऊर्जाचे नवीन प्रकल्प आस्थापित करण्यासाठी जमीनींचे संपादन करणे | | | | | |

**सुचना :-**

सेवा निवृत्त अधिकाऱ्यांनी महाऊर्जाच्या वेबसाईटवर Vacancies या शिर्षकाखाली कंत्राटी / सेवा करार पध्दतीने नायब तहसिलदार / मंडल अधिकारी या पदासाठी जाहिरातीत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात “सेवा करार पध्दतीने सेवानिवृत्त नायब तहसिलदार / मंडल अधिकारी” या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दि.०७/०२/२०२५पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ वा. ते सायं.६.१५ वा.) पर्यंत महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, (महाऊर्जा) औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर,पशुसंवर्धन आयुक्तालया शेजारी, औंध, पुणे-४११ ००७ येथे हार्ड कॉपीमध्ये आवक नोंदणी विभागात सादर करावेत. दि.०७/०२/२०२५ रोजी सायंकाळी ६ .१५ वा. नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

ठिकाण : पुणे
दि.२३/०१/२०२५

स्वाक्षरी/-
महासंचालक महाऊर्जा पुणे

## महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
## सेवानिवृत्त नायब तहसिलदार / मंडल अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने
## अर्ज सादर करावयाच्या अटी व शर्ती

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), औंध, पुणे कार्यालयाअंतर्गत शासकीय सेवेतून, सेवानिवृत्त नायब तहसिलदार / मंडल अधिकारी यांस कंत्राटी / सेवा करार पध्दतीने घेणेसाठी अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००/ १३, दि.१७/१२/२०१६, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००/ १३, दि.२१/०२/२०१८ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००(भाग १)/ १३, दि.०८/०९/२०२३ यास अधीन राहून करण्यात येईल.

२. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती ११ महिन्याकरिता असेल. परंतु अशी नियुक्तीस आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता नुतनीकरण करता येईल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

३. सेवा करार पध्दतीवर नियुक्त करताना नायब तहसिलदार / मंडल अधिकारी या पदाच्या कामकाजाचा किमान १० वर्ष अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

४. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांस विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळेत नियुक्त अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुतलेली नसावी.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहीर करणे आवश्यक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणारे कागदपत्र /माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता बाळगणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

९. नियुक्त अधिकारी यांचे कामकाजाबाबत सक्षम असलेल्या प्राधिकारी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१०. उमेदवारांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक नंतर कळविण्यात येईल.

११. उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

१२. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. सदर व्यक्तीने महाऊर्जाकडे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.सदर बंधपत्रात / हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासन निर्णयानुसार विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने विहीत केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच शासनाचे / महाऊर्जाचे नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार येणार नाही हे नमुद करावे.

१३. नियुक्ती कालावधीत प्रचलित शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमीक, भत्ते व प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१४. सेवा निवृत्त अधिकाऱ्यांनी महाऊर्जाच्या वेबसाईटवर Vacancies या शिर्षकाखाली सेवा करार पध्दतीने प्रशासन अधिकारी या पदासाठी जाहिरातीत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात "नायब तहसिलदार / मंडल अधिकारी" या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दि.०७/०२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ वा. ते सायं.६.१५ वा.) पर्यंत महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, (महाऊर्जा) औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर,पशुसंवर्धन आयुक्तालया शेजारी, औंध, पुणे-४११ ००७ येथे हार्ड कॉपी आवक नोंदणी विभागात सादर करावी. दि.०७/०२/२०२५ रोजी सायंकाळी ६ .१५ वा. नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अन्य पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.